| | | |
|---|---|---|
| MHKO050030752016 | **नियमित दिवाणी दावा क्र.११८/२०२४ मधील नि.१९ खालील आदेश** | नरेशगोंडा बाबासो पाटील<br>वि.<br>अनिल राजाराम कांबळे, वगैरे |

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज दावा मिळकती रस्त्यामध्ये प्रतिवादी यांनी कोणतेही बांधकाम अडथळा करु नये अशी मनाई ताकीद निशाणी ५ चे मनाई अर्जाचे अंतिम निकालापावेतो करणेबाबत दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी मनाई अर्जास म्हणणे दिले आहे. प्रतिवादी मुदत घेवून दावा मिळकतीत जाणे–येण्याच्या रस्त्यात बांधकाम जोरात करीत आहेत. प्रतिवादीने बांधकाम पुर्ण केल्यास वादीचा दावा निष्फळ होणार आहे. त्यामुळे वादी यांनी निशाणी ५ च्या मनाई अर्जाचे अंतिम निकालापावतो मनाई मिळणे विषयी विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि.२४ कडे म्हणणे दाखल करुन वादी यांचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, अर्जातील कथने खोटी आहेत. वादी म्हणतात त्याप्रमाणे तो दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करीत नाही त्यामुळे मनाई देण्याचा प्रश्न नाही. प्रस्तुत प्रतिवादी निशाणी ५ कडे युक्तीवाद करण्यास तयार आहेत. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्जातील कथने व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केला आहे व निशाणी ५ कडे दाव्याच्या निकालापावेतो प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील रस्त्यात कोणतेही बांधकाम करु नये अशी मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामी वादी यांचा निशाणी ५ मनाई अर्जावरील युक्तीवाद झाला असून प्रतिवादीचे युक्तीवादाकरीता प्रलंबीत आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज निशाणी ५ चे अर्जाचे निकालापोवेतो प्रतिवादीने कोणतेही बांधकाम करु नये अशी मनाई ताकीद मिळणेसाठी केला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे

म्हणणेमध्ये तो दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करीत नाही असे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनीही प्रस्तुत कामी पुढील नेमले तारेखेपर्यंत कोणतेही बांधकाम करीत नाही असे न्यायालया समक्ष सांगीतले आहे. त्यामुळे प्रस्तुत कामी प्रस्तुत प्रकरणातील पुढील नेमली तारखेपर्यंत मनाई ताकीद देणे योग्य होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अशंत: मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी अगर तर्फे इसम यांनी वाद रस्त्यावर पुढील तारखेपर्यंत कोणतेही बांधकाम करु नये.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.05.10 18:53:44 +0530

**इचलकरंजी**
**दिनांक–१०/०५/२०२४**

**(संजय दि. वानखेडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**